14 DEC 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चांगल्या मानांकनासाठी सातत्य हवे

## डॉ. शिर्के : 'महावीर'मध्ये नॅकच्या नव्या मूल्यांकन पद्धतीवर परिषद

कोल्हापूर, ता. १३ : नॅक मूल्यांकनासाठी महाविद्यालय पातळीवर प्रशासकीय कामात सातत्य हवे. नॅकची प्रक्रिया नियमितपणे चालणारी आहे. नियमितपणे नॅकचे काम केल्यास चांगले मानांकन मिळविता येते, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

महावीर महाविद्यालयात नॅक मूल्यांकनाच्या नव्या पद्धतीबाबत महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे (आय.क्यु.ए.सी.) आयोजित राष्ट्रीय परिषदेत उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. एस. एम. पाटील होते.

डॉ. शिर्के म्हणाले, ''पहिल्या दिवसापासूनच बदललेल्या मूल्यांकन पद्धतीनुसार पुढील मूल्यांकनाची



**कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात नॅक परिषदेचे उद्घाटन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. गणेश हेगडे, डॉ. विनायक शिरगूरकर, डॉ. शिरीष चिंधडे, प्रा. एस. एम. पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, प्राचार्य एच. व्ही. देशपांडे, डॉ. एम.एस. पद्मिनी व अन्य मान्यवर.**

तयारी महावीर महाविद्यालयाने सुरू केली आहे, ही अभिनंदनीय बाब आहे.''

डॉ. गणेश हेगडे यांनी आपल्या बीजभाषणातून नव्या मूल्यांकन पद्धतीबाबत विश्लेषण केले. प्रा पाटील म्हणाले, ''नॅकची नवीन मूल्यांकन पद्धती स्वागतार्ह असून, मूल्यांकनामध्ये अधिक वस्तूनिष्ठता व भक्कमपणा यायला मदत होईल.''

प्राचार्य डॉ. विनायक शिरगुरकर (पुणे), नॅक पिअर टीम मेंबर डॉ. शिरीष चिंधडे (पुणे), डॉ. एच. व्ही. देशपांडे (कोल्हापू), प्रा. डॉ. एम.एस. पद्मिनी यांनी मार्गदर्शन केले.

निमंत्रक व प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. सहनिमंत्रक डॉ. बी. ए. नाईक यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. कल्पना संगातीकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. श्रीकांत बच्चे यांनी आभार मानले. प्राचार्य एच. व्ही. देशपांडे, डॉ. एम.एस. पद्मिनी, नगरसेवक अशोक जाधव, डॉ. भरत नाईक, प्रा. प्रदीप गायकवाड आय.क्यु.ए.सी. समन्वयक प्रा. अजित चौगुले, प्रा. जयवंत दळवी, प्रा. डॉ. सरला मेनन, प्रा. डॉ. सुजाता पंडित, प्रा. डॉ. शैलजा मंडले, प्रा. डॉ. अरुण पाटील, प्रा. डॉ. महादेव शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 DEC 2017
पुढारी




**कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात 'नॅक'च्या वतीने आयोजित परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. एस. एम.पाटील, प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे आदी.**

# नियमितपणा ठेवल्यास 'नॅक'मध्ये चांगले मानांकन मिळणे शक्य

## प्र. कुलगुरू डॉ. शिर्के; महावीरमध्ये 'नॅक' कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'नॅक'ची प्रक्रिया ही निरंतर व नियमितपणे चालणारी आहे. नॅक मूल्यांकनासाठी महाविद्यालय पातळीवर प्रशासकीय कामात सातत्य, नियमित कामकाजानेच मूल्यांकनात चांगले मानांकन मिळविणे शक्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महावीर महाविद्यालयात राष्ट्रीय मूल्यांकन प्रत्यायन परिषद (नॅक) यांच्या वतीने नव्याने कार्यान्वित झालेल्या मूल्यांकन पद्धतीबाबत आयोजित परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.एस.एम.पाटील होते. डॉ. शिर्के म्हणाले, 'नॅक'च्या बदललेल्या मूल्यांकनपद्धतीनुसारमहाविद्यालयांची तयारी सुरू आहे. मूल्यांकनासाठी नियमितपणे डॉक्युमेंटेशन होणे गरजेचे आहे.


याप्रसंगी प्राचार्य डॉ. विनायक शिरगूरकर (पुणे), नॅक पिअर टीम मेंबर डॉ. शिरीष चिंधडे, डॉ.एच.व्ही. देशपांडे, प्रा. डॉ.एम.एस.पद्मिनी (कोल्हापूर) यांनी मार्गदर्शन केले. स्वागत-प्रास्ताविक प्राचार्य डॉ.आर. पी.लोखंडे केले. पाहुण्यांची ओळख सहनिमंत्रक डॉ.बी.ए.नाईक यांनी केले. प्रा. श्रीकांत बच्चे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. शरद गायकवाड, प्रा. अजित चौगुले यांनी केले.

14 DEC 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय संविधान मानव अधिकारांनी समृद्ध

भारतीय संविधान हे मानव अधिकारांनी समृद्ध आहे. संविधान तयार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगभरातील इतर संविधानांचा अभ्यास केला होता; मात्र इतर देशांतील संविधानांपेक्षा भारतीय संविधान हे अधिक विस्तृत आणि स्पष्ट आहे. संविधानात मानवी हक्क, त्यांचे मूल्य आणि अधिकारांची विशेष जपणूक करण्यात आली आहे, अशी भावना अमेरिकेतील ज्येष्ठ विधिज्ञ डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांनी व्यक्त केली. ते केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या 'ग्यान' उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यानासाठी आले आहेत.

## डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन



■ कोल्हापूर / वैभव गोंधळी

**▶ प्रश्न : भारतीय आणि अमेरिकेतील संविधानात साम्य आणि वेगळेपण काय?**

उत्तर : भारतीय संविधान हे येथील न्यायालयांसाठी आणि येथील लोकांसाठी आहे. त्यामुळे ते अतिशय विस्तृत स्वरूपातले आहे. अमेरिकन संविधान हे अतिशय लघु स्वरूपात तयार करण्यात आले आहे आणि त्यामध्ये वेळोवेळी बदल करण्याची भूमिका असली तरी संविधानात दुरुस्ती करणे सहज शक्य नाही.

**▶ प्रश्न : दोन्ही देशांच्या कायद्यांबद्दल काय मत आहे?**

उत्तर : भारतातील कायदे हे मानवाधिकार जपणारे आहेत. आज मी येथील न्यायालयाला भेट दिली तेव्हा मला जाणवले की, येथे आरोपींनाही अतिशय सन्मानाची वागणूक दिली जाते. अमेरिकेमध्ये मात्र असे होत नाही. पूर्वी अमेरिकेमध्ये अतिशय अमानवी शिक्षा केल्या जात असत. अलीकडील काळात त्या बंद करण्यात आल्या आहेत. अमेरिकन संविधान फार जुने असले तरी त्याच्यावर अनेक आक्षेप आहेत. अलीकडील काळात भारतीय संविधानातील काही गोष्टींचा अमेरिकन संविधानात समावेश करण्यात आला आहे.

**▶ प्रश्न : दोन्ही देशांतील स्वातंत्र्य लढ्याविषयी काय मत आहे?**

उत्तर : भारत आणि अमेरिका या दोन्ही




युरोपियन देशांच्या वसाहती होत्या. अमेरिकेत प्रांतांनी वेगवेगळे लढे दिले आणि ते स्वतंत्र झाले. प्रांतांना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते एकत्र आले. भारतात विविध संस्थाने, राजे राजवाडे होते, तरीही महात्मा गांधी आणि इतर स्वातंत्र्यसैनिकांच्या आवाहनानुसार येथील सर्व जातिधर्मा[illegible] लोकांनी एकत्र येऊन लढा दिला. त्यामुळे भारताला आपली संस्कृती जपता आली; मात्र अमेरिकेवर ब्रिटिश संस्कृतीची छाप कायम आहे. युरोपला गेल्यावर आपण अमेरिका सोडून आलो आहोत, असे वाटतच नाही.

**▶ प्रश्न : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या योगदानाबद्दल काय वाटते?**

उत्तर : डॉ. आंबेडकर हे विद्वत्तेचे प्रतीक म्हणून जगाला मार्गदर्शक आहेत. संविधान निर्मिती करताना त्यांनी संशोधनावर भर दिला. जगभरातील संविधानांचा गाढा अभ्यास केला. भारताच्या आणि जगाच्या संविधान निर्मितीच्या इतिहासात आणि भविष्यातही त्यांना आदर्श स्थानी मानले पाहिजे.

### लोकप्रतिनिधींच्या पगारवाढीच्या दुरुस्तीस २०३ वर्षांनी मान्यता

अमेरिकन संविधानास १७ सप्टेंबर, १७८७ रोजी त्यांच्या मसुदा समितीने देशासमोर ठेवले, तर ९ राज्यांच्या मान्यतेनंतर २५ सप्टेंबर १७८९ मध्ये ते अमलात आले. त्याच वर्षी सिनेट आणि हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह यांच्या वेतनवाढ आणि कपातीसंबंधीच्या दुरुस्तीची मागणी समोर आली; मात्र ही दुरुस्ती तब्बल २०३ वर्षांनी ७ मे, १९९२ रोजी मान्य करण्यात आली. विशेष म्हणजे या दुरुस्तीनुसार चालू असलेल्या सभागृहातील सदस्यांना स्वतःची वेतनवाढ अथवा कपात करण्याचा अधिकर नसून, पुढील सभागृहाची वेतनवाढ अथवा कपात करण्याचा अधिकार देण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 DEC 2017
पुढारी

# विद्यापीठ आंतरविभागीय ज्युदो संघात आठ जणांची निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष ज्युदो स्पर्धा शिवाजी विद्यापीठ येथे बुधवारी उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत विविध वजन गटांत प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या ८ खेळाडूंची शिवाजी विद्यापीठाच्या ज्युदो संघात निवड झाली आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतून १२० विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. विजेत्या खेळाडूंचे विद्यापीठामार्फत शिबिर घेतले जाणार आहे व त्यानंतर या खेळाडूंना चंदिगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार आहे.

संपूर्ण स्पर्धेत सुरुवातीपासूनच कोल्हापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या खेळाडूंनी वर्चस्व राखले. या स्पर्धेत सचिन पाटील (५६ किलो, स. ब. खाडे महाविद्यालय), रणविरसिंह भोसले (६० किलो, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर), अक्षय कांबळे (६६किलो, कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी), सिद्धार्थ साळोखे (७३ किलो, सायबर महाविद्यालय, कोल्हापूर), शाहरूख मुलाणी (८१ किलो, शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर), तुषार सातपुते (९० किलो, विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर), वैभव रासकर (१०० किलो, विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठवडगाव), शंकर चौगले (१०० किलोवरील गट, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ) या खेळाडूंनी प्रथम क्रमांक प्राप्त केला.

भारतीय ज्युदो संघाचे प्रशिक्षक रघुनाथ शिंत्रे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड होते. यावेळी डॉ. अभिजित वणिरे, प्रा. शांताराम माळी, डॉ. धनंजय पाटील, प्रा. किरण पाटील, प्रा. बाजीराव पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. पंच म्हणून शरद पोवार, वीरधवल पाटोळे आदींनी काम पाहिले.

14 DEC 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘नॅक’च्या मूल्यांकनात ‘आयसीटी’ नंबर वन!

## कोल्हापूरचे सुपुत्र कुलगुरु डॉ. जी. डी. यादव यांच्या मार्गदर्शनाखाली घौडदौड

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशभरातील इंजिनिअरिंग संस्थांमध्ये वेगळा ठसा उमटविणाऱ्या मुंबईच्या द इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) संस्थेने आपल्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा खोवला आहे. राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेच्यावतीने (नॅक) जाहीर करण्यात आलेल्या मूल्यांकनात आयसीटीला अ मूल्यांकन मिळाले. देशभरातील १५० संस्थांना मागे टाकत आयसीटीने पहिल्या प्रयत्नातच हे यश मिळविले. आयसीटीचे कुलगुरु डॉ. जी. डी. यादव हे कोल्हापूरचे सुपुत्र आहेत. त्यामुळे कोल्हापूरकरांसाठी ही बाब कौतुकास्पद आहे.

नॅकतर्फे जाहीर करण्यात आलेल्या मुल्यांकनात आयसीटीला ४ पैकी ३.७७ गुणांचा सीजीए मिळाला. देशभरातील इंजिनिअरिंग संस्थांमध्ये हे मूल्यांकन मिळविणारी आयसीटी ही एकमेव संस्था ठरली आहे. राष्ट्रीय मुल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेच्यावतीने नुकतीच मूल्यांकनाची घोषणा करण्यात आली आहे. आयसीटीची स्थापना १९३३ साली झाली असून सध्या ही स्वायत्त संस्था म्हणून कार्यरत आहे. पारंपरिक इंजिनिअरिंग अभ्यासक्रमांसोबतच संस्थेतील फूड इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी टेक्स्टाइल टेक्नॉलॉजी, आणि ग्रीन टेक्नॉलॉजीच्या अभ्यासक्रमांनाही पसंती मिळाली आहे. एकीकडे देशभरातील इंजिनिअरिंग महाविद्यालयांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न चिन्ह उभारले जात असताना आयसीटीने केलेली ही कामगिरी अभिमानास्पद आहे.

आयसीटीच्या या कामगिरीमुळे संस्थेवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ‘ब्रिक्स देशांच्या क्यूएस रँकींग’ मध्येही आयसीटीने ११८वे स्थान प्राप्त केले आहे. तसेच राष्ट्रीय स्तरावरील ‘इन्स्टिट्यूट ऑफ एक्सलन्सी’ हे नामांकनही संस्थेस मिळाले आहे.



पहिल्याच प्रयत्नात आयसीटी यशस्वी ठरली आहे. देशभरात सर्वोत्तम गुण मिळवित आमची संस्था अव्वल ठरली आहे. या यशात संस्थेचे विद्यार्थी, कर्मचारी यांचे योगदानही महत्वाचे आहे. राष्ट्रीय स्तरावर इन्स्टिट्यूट ऑफ एक्सलन्सी हे नामांकनही संस्थेस मिळाले आहे.

**– डॉ. जी. डी. यादव, कुलगुरु आयसीटी**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 DEC 2017
लोकमत

# महिला क्रिकेट स्पर्धेत कमला कॉलेजची हॅट्ट्रिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**जयसिंगपूर** : शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय महिला क्रिकेट स्पर्धेत कमला कॉलेजने विजेतेपद पटकाविले. डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयाचा ९ विकेटने पराभव करुन कमला कॉलेजच्या संघाने सलग तिसऱ्या वर्षी विजेतेपदावर नाव कोरले.

येथील श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालयवतीने शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय महिला क्रिकेट स्पर्धा पालिकेच्या क्रीडांगणावर झाल्या. या स्पर्धेत आठ महाविद्यालयाच्या संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये कमला कॉलेजने कन्या महाविद्यालय इचलकरंजीचा तर जे. जे. मगदूम कॉलेजने जयसिंगपूर कॉलेजचा पराभव करुन अंतिम फेरीत प्रवेश केला होता. अंतिम सामन्यात जे. जे. मगदूम इंजिनिअरींग कॉलेजवर ९ विकेट राखून कमला कॉलेजने विजेतेपद पटकाविले. विजयी संघांना प्राचार्य बी. एम. राठोर, प्रा. संजय पाटील, प्रा. सुधीर वाटवे, प्रा. स्वाती बस्तवाडे यांच्या हस्ते चषक देण्यात आले. स्पर्धेचे संयोजन प्रा. जहाँगीर तांबोळी, प्रा. रविंद्र काक्रंबे, अमोल भोजणे यांनी केले. पंच म्हणून लक्ष्मण पडियार, तुषार भिसे, सद्दाम तांबोळी, पंकज शहा यांनी काम पाहिले.

14 DEC 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ मैदानी स्पर्धेत संजीवनी जाधवची विक्रमी वेळ

## पाच हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्ण

**गुंटूर, ता. १३ :** भविष्यात लांब पल्ल्याच्या शर्यतीत भारताचे आशास्थान असलेल्या महाराष्ट्राच्या संजीवनी जाधवने महिलांच्या पाच हजार मीटर शर्यतीत सुवर्णपदक जिंकून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेतील निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले.




आचार्य नागार्जुना विद्यापीठाच्या यजमानपदाखाली स्पर्धा सुरू आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नाशिकच्या संजीवनीचे यंदाच्या मोसमातील पाच हजार मीटर शर्यतीतील हे सलग चौथे सुवर्णपदक होय. आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत ब्राँझपदक जिंकणाऱ्या संजीवनीने अगदी सहजपणे ही शर्यत जिंकली. प्रतिस्पर्ध्यांना अजिबात संधी न देता तिने १५ मिनिटे ५१.५८ सेकंद अशी विक्रमी वेळ दिली. संजीवनीने गेल्या वर्षी कोईम्बतूर येथे नोंदविलेला स्वतःचाच १५ मिनिटे ५९.१७ सेकंदाचा विक्रम मोडित काढला. अल फलाह विद्यापीठाच्या वर्षा देवीला (१६ मिनिटे ५०.२३ सेकंद) रौप्य; तर दीनदयाल उपाध्याय विद्यापीठाच्या डिम्पल सिंगला (१६ मिनिटे ५६.८८सेकंद) ब्राँझपदकावर समाधान मानावे लागले.

पुरुषांच्या शर्यतीत गतविजेत्या किसन तडवीला या वेळी रौप्यपदकावर समाधानी राहावे लागले. पंजाबच्या रणजित कुमारने त्याला मागे टाकून १४ मिनिटे ३९.१९ सेकंद अशी वेळ देत सुवर्णपदक जिंकले. किसनने रौप्यपदक पटकावताना १४ मिनिटे ३९.५६ सेकंद अशी वेळ दिली.

## चैत्राली गुजर वेगवान धावपटू

गेल्या महिन्यात येथेच ज्युनिअर राष्ट्रीय स्पर्धेत वेगवान धावपटूचा किताब मिळविणाऱ्या साताराच्या चैत्राली गुजर हिने आंतरविद्यापीठ स्पर्धेतही वेगवान धावपटूचा मान मिळविला. वडील कालिदास यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या चैत्रालीने सातव्या लेनमधून वेगवान प्रारंभ केला आणि १२.०८ सेकंदात सुवर्णपदक जिंकले. एका महिन्यात याच मैदानावर दोनदा सुवर्णपदक जिंकल्याने हे मैदान माझ्यासाठी लकी आहे, असेच म्हणावे लागेल, अशी प्रतिक्रिया तिने दिली. विशेष म्हणजे १९९२ मध्ये ग्वाल्हेर येथील स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या झेनिया आयर्टनने शंभर मीटर शर्यत जिंकली होती. त्यानंतर महाराष्ट्रातील विद्यापीठाच्या एकाही धावपटूस महिला विभागात सुवर्णपदक जिंकता आले नव्हते. हा दुष्काळही



चैत्रालीने संपविला. उस्मानियाच्या जी. नित्याला रौप्य; तर महात्मा गांधी विद्यापीठ कोट्यायमच्या एन. एस. सिमीला ब्राँझपदक मिळाले. पुरुष विभागात मंगळूरच्या एलक्या दासनने १०.४९ सेकंदाचा नवीन स्पर्धा विक्रम करीत सुवर्णपदक जिंकले. मद्रासच्या शिवाकुमारला १०.७४ सेकंदात रौप्य; तर पुण्याच्या शशांक शिंदेला १०.७६ सेकंदात ब्राँझपदक मिळाले.